# संमती पत्र

कृषि उत्पन्न बाजार समिती, -----------------------
ता. ---------------------- जि. -----------------
दिनांक :

**प्रति,**
**कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ तथा**
**प्रमुख्य, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि पणन), MACP**
**पुणे**

**विषय - एम.ए.सी.पी प्रकल्पा अंतर्गत प्रस्तावित सुधारणांची अंमलबजावणी करण्याबाबत.**

महोदय,

महाराष्ट्र शासनाव्दारे जागतिक बॅकेच्या अर्थसहाय्याने महाराष्ट्र कृषी स्पर्धाक्षम प्रकल्पामध्ये आमच्या बाजार समितीमध्ये प्रस्तावित सुधारणा कार्यक्रम राबविण्यासाठी अर्थसहाय्य मंजुर करण्याची MACP प्रकल्प कार्यलयाकडे विनंती कर्ण्यात आली आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने सुचविलेल्या खालील सुधारणांची (Reform) अंमलबजावणी करण्याची आम्ही याद्वारे हमी देत आहोत.

| अनु.क्रं. | सुधारणांचे विवरण |
|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने विहीत केलेले आदर्श उपविधी स्विकारण्यात येतील. |
| २ | कामकाजाचे संगणकीकरण करणे व आदर्श लेखापध्दती स्विकारणे,आदर्श लेखा नियमाप्रमाणे वार्षिक अहवाल तयार करणेची पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. |
| ३ | बाजार समितीचे उत्पन्न व खर्च , निविदा कागदपत्रे इ. माहीतीस योग्य प्रसिध्दी देण्यात येईल. |
| ४ | उत्पादक ते किरकोळ व ठोक ग्राहकांना थेट विक्रीची व्यवस्था करण्यात येईल. |
| ५ | जाहीर लिलाव पध्दती अवलंब कर्ण्यात येईल. |
| ६ | विविध परवाने देण्यासाठी व त्याचे सनियंत्रण करण्यासाठी संगणकीकरण करण्यात येईल. |
| ७ | इलेक्ट्रॉनिक वजन काटा उभारणी करण्यात येईल. |
| ८ | संगणकीकृत लिलाव पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. |
| ९ | मालाची विक्री झाल्या नंतर २४ तासाच्या आत पेमेंट करण्यासंबंधात देखरेख व्यवस्था स्थापित करण्यात येईल. |
| १० | बाजार सुविधा देखभाल करण्यासाठी लागणारा निधी हा वार्षिक सुविधा करण्यासाठी केलेल्या गुंतवणुकीच्या १ टक्के या दराने 'देखभाल निधि' स्वतंत्र खात्यामध्ये ठेवण्यात येईल. व तसेच प्रकल्पामध्ये उभारणी केलेल्या मालमत्तेचा देखभाल व डागडुजी यासाठी या निधीचा वापर करण्यात येईल. |
| ११ | बाजार फलकाव्दारे बाजार आवारामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी बाजार भाव प्रदर्शित करण्यात येतील. |
| १२ | बाजार आवारामध्ये यथोचितकचरा व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. |
| १३ | येणा-या सर्व माल वाहतूक करणा-या वाहनाची ( बैलगाड्यासह) संगणकाव्दारे वाहन तपशील (दिनांक, वेळ, मालाचा प्रकार) नोंद करण्यात येईल. |
| १४ | खाजगी व सरकारी भागीदारीत Public Private Partnership (PPP) गुंतवणूकीची बाजार समितीची तयारी आहे. |
| १५ | शेतमाल तारण योजना / गोदाम पावत्या तसेच वायदे बाजारांशी कनेक्टिव्हीटी / ई-ट्रेडींग इ. ची स्विकारण्याची बाजार समितीची तयारी आहे. |

तसेच, या प्रकल्पाअंतर्गत बाजार समितीमध्ये करावयाच्या गुंतवणुकीमध्ये बाजार समिती आपला अर्थिक सहभाग उचलण्याची हमी देत आहे. महाराष्ट्र कृषी स्पर्धाक्षम प्रकल्प अंमलबजावणीत कंत्राटदार, पुरवठादार व सल्लागार यांना भुगतान करण्यासाठी कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती व सचिव यांच्या शिफारशीनुसार जिल्हा स्तरावर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या या प्रकल्पासाठी उघडावयाच्या बॅंक खात्यावरून जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था व त्यांचे कार्यालयातील अहिरण व संवितरण अधिकारी यांच्या सह्या असलेल्या क्रॉस धनादेशाव्दारे भुगतान करण्याच्या कार्यपध्दतीस आमची संमती आहे. या सर्व भुगतानाचे लेजरनिहाय हिशेब जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था हे ठेवतील.

**आपले विनीत,**

| | |
|---|---|
| **सभापती** ---------------------------------------- | **सचिव** ------------------------------------ |
| कृषि उत्पन्न बाजार समिती ------------------ | कृषि उत्पन्न बाजार समिती ------------------ |
| जिल्हा------------------- | जिल्हा------------------- |

(बाजार समितीचा शिक्का)